**राज्य आरोग्य माहितीवजीवनविषयकआकडेवारी कार्यालय**

**महाराष्ट्र शासन —सार्वजनिकआरोग्य विभाग**

ऊरो रुग्णालय इमारत, तिसरा मजला, औंध पुणे— ४११०२७

सत्यमेव जयते

उपसंचालक, आरोग्य सेवा (आ मा जी आ), पुणे
तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू
महाराष्ट्र राज्य.

संकेतस्थळ : arogya.maharashtra.gov.in
कार्यालय : 020–26050024,25
ई –मेल: crslegalcell@gmail.com


**आरोग्य सेवा** जा.क्रआमाजीआ/कक्ष-८३/अभिलेख पुनर्निर्मिती/न. क्र.६२/ 5640-14/२०२६ दि.14/०५/२०२६

प्रति,
जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निबंधक जन्म मृत्यु नोंदणी ,
जिल्हा परिषद .......(सर्व )

विषय: नष्ट झालेल्या किंवा खराब/जीर्ण झालेल्या जन्म मृत्यु नोंदणी अभिलेखांच्या पुनर्निर्मितीसाठी सूचना.
संदर्भ : केंद्र शासनाचे परिपत्रक क्र १/२/२००–व्हीएस (सीआरएस) दिनांक २२.०८.२०१२

केंद्र शासनाचे जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम ३०(२)क अंतर्गत महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी नियम १७(१) व (४) मधील तरतुदीनुसार जन्म मृत्यु व उपजत मृत्यु चे सर्व अभिलेख हे कायम स्वरुपी जतन करुन ठेवणे हि निबंधकाची जबाबदारी आहे.निबंधकाने जन्म आणि मृत्यू नोंदणी नोंदवहया आपल्या कार्यालयात जन्म नोंदवहया ६ वर्ष व मृत्यु नोंदवहया किमान एक वर्ष ठेवावे आणि त्यानंतर ते सुरक्षित ठिकाणी नियुक्त प्राधिकरणाकडे हस्तांतरित करावे. तथापि सर्व निबंधकांनी अभिलेख कक्षात सुरक्षित ठेवण्यासाठी संबधित नियुक्त प्राधिकारी यांचे कडे हस्तांतरित करण्यापुर्वी नोंदणी करण्यात आलेल्या सर्वांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आल्याची खात्री करावी. जेणे करुन परत प्रमाणपत्र देण्याकरीता सुरक्षित ठिकाणाहुन नोंदवहया परत आणण्याची गरज पडणार नाही.

जुन्या जन्म मृत्युच्या नोंदवहया वारंवार वापरल्यामुळे त्या जीर्ण होतात आणि वापरण्यास अयोग्य ठरतात. तसेच इतर नैसर्गिक आपत्तीजनक कारणांमुळे नोंदवहया नष्ट झालेल्या किंवा खराब झालेल्या आहेत. अशा नोंदणीचे दाखले घेण्यासाठी नागरिक येत असतात तेव्हा त्यानां दाखले देण्यात अडचण निर्माण होते याबाबत विविध जिल्ह्यांकडून या कार्यालयाकडे मार्गदर्शन मागविण्यात येते. याबाबत केंद्र शासनाच्या संदर्भीय परिपत्रकानुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर परिपत्रकानुसार नोंदींच्या पुनर्निर्मितीसंदर्भात सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे देण्यात येत आहेत.

नोंदीच्या पुनर्निर्मितीची प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी खालील मुद्दे विचारात घ्यावेत

१) जर कोणत्याही कारणामुळे जन्म आणि मृत्यू नोंदणी अभिलेख (रेकॉर्ड्स) गहाळ, खराब किंवा नष्ट झाले असतील, तर संबंधित नोंदणी कार्यालयाचे निबंधक (ग्रामीण भागाकरीता), गटविकास अधिकारी किंवा कोणत्याही विहित प्राधिकरणाद्वारे, गहाळ/खराब/नष्ट झालेल्या अभिलेखांच्या पुनर्निर्माणाबाबत आवश्यक अधिसूचना/मान्यता जारी करण्यासाठी, सबळ कारणांसह जिल्हा निबंधकांकडे प्रस्ताव सादर करतील. शहरी भागांच्या बाबतीत नगरपालिका आणि महानगरपालिकेचे निबंधक असा प्रस्ताव जिल्हा निबंधक यांच्याकडे सादर करतील. जन्म/मृत्यू नोंदणी अभिलेखांच्या पुनर्निर्माणाबाबतची अधिसूचना/मान्यता संबंधित अधिकाऱ्यांनी आवश्यक छाननी केल्यानंतरच दिली जाईल. संबंधित निबंधक अभिलेखांच्या पुनर्निर्माणाची कार्यवाही केवळ अशी अधिसूचना/मान्यता प्राप्त झाल्यानंतरच करतील. अभिलेखांच्या पुनर्निर्माणासाठी खालील कार्यपद्धतीचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

अ) संबंधित व्यक्तीने सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्याच्या आधारे नोंदवहीची पुनर्रचना करण्यात येईल.

ब) निबंधक संबंधित नोंदणी केंद्राच्या क्षेत्रात सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करून लोकांना जन्म/मृत्यू नोंदणीच्या घटनांचे पुरावे( उदा. जन्म किंवा मृत्यू प्रमाणपत्रे इत्यादी) विहित मुदतीत पाठवण्यास सांगू शकतात. व्यक्तींनी अशा प्रकारे सादर केलेला पुरावा नोंदणी धिकाऱ्यांकडून कायमस्वरूपी अभिलेख म्हणून जतन केला जाईल.

क) ज्या प्रकरणात संबंधित व्यक्तीकडे जन्म आणि मृत्यूचा लेखी पुरावा उपलब्ध नसेल, त्या प्रकरणात शासकीय कार्यालयातील, शालेय अभिलेख इत्यादींमधील जन्म किंवा मृत्यूच्या तारखेची नोंद करावी, आणि त्यासोबत ज्या अभिलेखाआधारे सदर नोंद करण्यात आली त्याचाही उल्लेख असावा.

ड) सदर पुनर्निर्मिती अभिलेख कालावधीतील जर जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्राची मागणी प्राप्त झाली आणि घटनेच्या नोंदणीचा कोणताही सबळ पुरावा आढळला नाही, तर असे गृहीत धरले जाईल की ती विशिष्ट घटना जन्म किंवा मृत्यूची नोंद संबंधित वर्षाच्या संबंधित नोंदवहीत झाली नव्हती. निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम कलम १७(१) नुसार व नियम १३(३) मधील कायदेशीर तरतुदीनुसार संबंधित व्यक्तीला अनुपलब्धता प्रमाणपत्र द्यावे. संबंधित व्यक्तीला विलंबित नोंदणीच्या कलम १३(३) मधील कायदेशीर तरतुदीबाबत आणि विहित कार्यपद्धतीचे पालन करण्याबाबत सांगावे.

२) जन्म मृत्युच्या नोंदवहया चोरी किंवा गहाळ होण्याच्या घटना टाळण्यासाठी, जन्म आणि मृत्यू नोंदणी निबंधकांनी जन्म आणि मृत्यू नोंदणीच्या नोंदी सुरक्षित ठिकाणी ठेवाव्यात. निबंधकांनी जन्म आणि मृत्यूच्या नोंदणीच्या नोंदींची तपासणी /हताळणी त्याच्या उपस्थितीतच होईल याची खबरदारी /काळजी घ्यावी.

३. एखाद्या विशिष्ट नोंदणी केंद्राच्या परिसरात नैसर्गिक आपत्तीची पूर्वकल्पना आल्यास किंवा नोंदणी कार्यालयात आग लागल्यास किंवा अपघात घडल्यास, निबंधकाने आपल्या अखत्यारीतील अभिलेख सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत आणि घटनेचा सविस्तर अहवाल तात्काळ संबंधित प्राधिकरणास पाठवावा. संबंधित प्राधिकरणाने जिल्हा निबंधकामार्फत मुख्य निबंधकांना कळविण्यात यावे.

४. जेव्हा जन्म आणि मृत्यू नोंदवहीची पाने जीर्ण होऊन फाटू लागतात, तेव्हा संबंधित निबंधकांनी ती पाने तात्काळ त्यांच्या मूळ स्वरूपात पुनर्निर्मित करण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना कराव्यात.

५. अभिलेखाच्या पुनर्रचनेची तारीख दर्शवून, संबंधित नोंदवहीच्या शेरांच्या रकान्यात अभिलेखाच्या पुनर्रचनेसंबंधी आवश्यक नोंद देखील करावी.

६. नोंदीबाबतच्या संभाव्य दुरुस्तीची शक्यता कमी करण्यासाठी, हे सुनिश्चित केले जावे की, जर संबंधित व्यक्तीकडे कागदोपत्री पुरावा उपलब्ध नसेल आणि कार्यालयीन नोंदी किंवा शाळेच्या नोंदींच्या आधारे नोंद केली जात असेल, तर तपशील नोंदवण्यापूर्वी संबंधित व्यक्तीकडून असे हमीपत्र(Affidavit) घेतले जावे की, संबंधित तपशील अचूक आणि अंतिम आहेत.

७. जिल्हा किंवा तालुका स्तरावरील सक्षम अधिकाऱ्यांनी नोंदणी केंद्राचे पर्यवेक्षण किंवा तपासणी करताना, जन्म आणि मृत्यू नोंदी योग्य रीतीने आणि सुरक्षितपणे ठेवल्या आहेत याची खात्री करावी.

जर अभिलेख सुरक्षित आणि योग्य पद्धतीने ठेवलेला नाही असे आढळल्यास, तपासणी प्राधिकरणाने निबंधकाला योग्य उपाययोजना करण्याचे निर्देश द्यावेत. त्यांच्या अहवालात या समस्या अधोरेखित केल्या पाहिजेत आणि त्याविषयी मुख्य निबंधक कार्यालयाला कळवण्यात यावे.

आपल्या जिल्हयातील सर्व संबंधित जन्म मृत्यु नोंदणी निबंधकांना या मार्गदर्शक सूचना कळविण्यात याव्यात, जेणेकरून नागरिकांना जन्म किंवा मृत्यू प्रमाणपत्रांपासून वंचित राहावे लागणार नाही. केलेल्या कार्यवाही बाबत या कार्यालयास कळविण्यात यावे.

(डॉ. बी. एस. कमलापूरकर)
उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजीआ), पुणे
तथा उपमुख्य निबंधक, जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य.

<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर:</u>

१) मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) मा. संचालक (रुग्णालय), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
३) मा.संचालक (प्राथमिक), आरोग्य सेवा, पुणे तथा मुख्य निबंधक, जन्म व मृत्यू, महाराष्ट्र राज्य